**<u>महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत गाव तलाव, पाझर तलाव व पारंपारिक पाणीसाठ्यामधील गाळ काढणेबाबत.</u>**

**महाराष्ट्र शासन**
नियोजन विभाग,
शासन निर्णय क्र. मग्रारोहयो- २०११/प्र.क्र. १८ /रोहयो-१
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक - २२ मार्च, २०११

**वाचा:** शासन निर्णय क्र. मग्रारोहयो-२००८/प्र.क्र. ३५/रोहयो-६, दि. २७/८/२००८.

**प्रस्तावना:-**

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम २००५ च्या अनुसूची-१ मधील परिच्छेद क्र. ५ तसेच महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, २००६ च्या परिच्छेद क्र. ७ (२) (ए) अन्वये पारंपारिक पाणीसाठा/तलावातील गाळ काढण्याच्या कामास मान्यता आहे. तद्नुसार संदर्भाधिन शासन निर्णय दि. २७/८/२००८ अन्वये सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तथापि क्षेत्रिय कार्यालयाकडून/यंत्रणेकडून असे निदर्शनास आले आहे की, उपरोक्त शासन निर्णयातील अटींमुळे सदर योजना प्रभावीपणे राबविण्यास मर्यादा येत आहे. तसेच सदर शासन निर्णयात गाव तलाव, पाझर तलाव व पारंपारिक पाणी साठ्यातील गाळ काढण्याबरोबर, विशेष दुरुस्ती व नुतनीकरण करणे इत्यादी बाबी समाविष्ट केल्या आहेत. प्रत्यक्षात सदर बाबी भिन्न असून याबाबत स्वतंत्ररित्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे आवश्यक आहे. उपरोक्त बाबी विचारात घेऊन शासन निर्णय दि. २७/८/२००८ अधिक्रमित करुन महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत केंद्र शासनाच्या निधीतून गाव तलाव, पाझर तलाव व पारंपारिक पाणीसाठ्यामधील गाळ काढण्याबाबत खालीलप्रमाणे शासन सुधारित आदेश देत आहे.

**<u>शासन निर्णय</u>:-**

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम २००५ च्या अनुसूची-१ मधील परिच्छेद क्र. ५ तसेच महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, २००६ च्या परिच्छेद क्र. ७ (२) (E) अन्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या निधीतून महाराष्ट्रातील पाझर तलाव, गाव तलाव व पारंपारिक पाणी साठ्यातील गाळ काढण्यास शासन मान्यता देत आहे.

<u>उपरोक्त कामे करण्यासाठी अटी व शर्ती खालीलप्रमाणे:-</u>

१) **<u>पाणीसाठयाचे अनुज्ञेय प्रकार</u>**

अ) सर्व तलाव (लघु पाटबंधारे, पाझर तलाव, पारंपारिक तलाव)

ब) सर्व बंधारे

क) सर्व विहिरी ( रोजगार हमी योजनंअंतर्गत घेतलेल्या विहिरी, पारंपारिक विहिरी, कृषि व पिण्याच्या पाण्याच्या विहिरी व खाजगी विहिरी यामध्ये पिण्याच्या पाण्याच्या विहिरींना प्राधान्य द्यावे)

२) **मालकी** :-

जिल्हा परिषद, पंचायत समित्या तसेच ग्रामपंचायती यांच्या मालकीच्या तसेच खाजगी मालकीच्या विहिरीतील गाळ काढण्यास अनुमती आहे.

३) **लघुस्तर** :- फक्त लघुपाटबंधारे स्थानिकस्तरा अंतर्गत (० ते १०० हेक्टर जिल्हा परिषद) (१०१ ते २५० स्थानिक स्तर) ही योजना अनुज्ञेय राहील.

४) गाळ काढण्याची कामे सर्वसाधारण परिस्थितीत घेण्याची परवानगी आहे. (टंचाईसदृश्य परिस्थिती नसतानांसुध्दा)

५) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत गाळ काढण्याच्या कामाकरिता खालील गोष्टी अनिवार्य आहेत.

अ) ग्रामपंचायत / ग्रामसभा यांचा निवडीबाबतचा ठराव व शिफारस.

ब) सर्व प्रकारच्या अकुशल कामासाठी जॉबकार्ड आवश्यक आहे.(जॉब कार्डवर नोंद घेणे अनिवार्य)

क) स्थानिक मजुरांनाच काम देणे.

ड) हजेरीपट ठेवणे, बँक किंवा पोष्टामार्फत मजुरीचे प्रदान करणे, इत्यादि कार्यपध्दतीचा अवलंब करणे.

इ) कंत्राटदार/ठेकेदार यांना बंदी राहील.

ई) मजुरीस पर्यायी होणाऱ्या मोठया यंत्रांना बदी राहील. तथापि हाताने वापरण्याची अवजारे वापरण्यास परवानगी आहे.

६) **अंमलबजावणी यंत्रणा :**

सर्वसाधारणपणे ग्रामपंचायतीद्वारे ही कामे करण्यात यावीत. तथापि अपवादात्मक परिस्थितीत पंचायत समितीद्वारे अथवा इतर यंत्रणेद्वारेही ही कामे घेता येतील.

७) **उन्हाळयामध्ये विशेष मोहिम :** जानेवारी ते जून (पावसाळयापूर्वी) या काळात ही कामे विशेषत्वाने घेण्यात यावीत.

८) तीन वर्षे जुन्या तलावातील गाळ काढण्यास परवानगी राहील.

९) एकाच हंगामामध्ये पावसाळा सुरु होण्यापूर्वी गाळ काढण्यात यावा व ते काम पूर्ण समजण्यात यावे.

१०) भूसंपादन अनुज्ञेय राहणार नाही.

११) काढलेला गाळ लोक/गावकरी घेऊन जातील असे गृहित धरुन फक्त खोदणे व शारीरीक श्रमाने गाळ काढणे व सर्वसाधारणपणे जास्तीस जास्त ३० मीटरपर्यंत गाळ वाहून नेण्याच्या खर्चाचा रकमेचा समावेश अंदाजपत्रकात करावा.

१२) काढलेला उपयुक्त गाळ लोकांनी घेऊन जाणे अभिप्रेत असल्यामुळे त्यांना आवश्यक ते प्रोत्साहन देण्यात यावे.

१३) गाळ काढण्याचे काम पूर्णतः अकुशल स्वरुपाचे असून अंदाजपत्रक तयार करताना कोणत्याही कुशल कामाचा समावेश त्यामध्ये करु नये.

१४) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत फक्त अकुशल कामाचा समावेश अंदाजपत्रकात करावा. तथापि सदर काम इतर योजनेशी (इतर योजना, लोकवर्गणी इत्यादी) सांगड घालून करण्यास हरकत नाही.

१५) गाळ काढण्याची कामे रॉयल्टीमुक्त राहतील. (शा.नि.क्र.गौखनि-१०९२/प्र.क्र.५२/ख. दिनांक ५ मार्च, १९९२ अन्वये)

१६) **पारदर्शकता**:-

१) कामांच्या संदर्भात तक्रार प्राप्त झाल्यास त्याबाबत उचित कार्यवाही करावी.

२) जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), उपजिल्हाधिकारी, गट विकास अधिकारी पंचायत समिती, उप अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी जुन्या तलावातील गाळ काढण्याच्या कामाची वेळोवेळी पाहणी करावी.

३) छायाचित्रे:- खालील टप्प्याचे छायाचित्र घेणे अनिवार्य राहील.

अ) प्रत्यक्ष काम सुरु असतानाचे

ब) गाळ काढलेल्या जागेचे

क) काढलेला गाळ शेतात टाकल्याचे.

४) प्रचलित सूचनांनुसार केलेल्या कामाच्या ठिकाणी फलक लावावेत.

५) ज्या गांव/परिसरात गाळ काढण्याचे काम केले असेल तेथे एक महिन्यात सामाजिक अंकेक्षण करुन घेण्याच्या सूचना वेबसाईटवर देण्यात आल्या आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

६) झालेल्या कामाचे स्वरुप, मजूरीचे प्रदान, गाळ काढल्याबाबतच्या आवश्यक त्या सर्व नोंदी यथोचितरित्या ठेवण्यात याव्यात.

७) पंचायत समिती लेखा परिक्षण, गावनिहाय मजूरी प्रदान झालेल्या कामाचे स्वरुप या बाबी संबंधित जिल्हा परिषद/पंचायत समिती सदस्य, विधानमंडळाचे सदस्य व संसद सदस्यांच्या निदर्शनास आणाव्यात.

१७) **प्रशासकिय व तांत्रिक बाबी.**

उपरोक्त कामास शासन निर्णय क्र. मग्रारोहयो-२०१०/प्र.क्र. ४७/रोहयो-१०, दि. ८ जून, २०१० मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रशासकीय व तांत्रिक मंजुरीचे अधिकार राहतील.

१) उपरोक्त कामास प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार ग्रामपंचायतीमार्फत काम केल्यास गट विकास अधिका-यांना तसेच यंत्रणेमार्फत काम केल्यास तहसिलदारांना राहतील.

२) ग्रामपंचायतीच्या कामाकरिता तांत्रिक मान्यता देण्याचे पूर्ण अधिकार पंचायत समितीच्या अभियंत्यास/जिल्हा परिषदेच्या उप अभियंत्यास राहतील. तसेच यंत्रणेच्या कामाकरिता तांत्रिक मान्यता देण्याचे पूर्णअधिकार संबंधित खात्याच्या तांत्रिक अधिकाऱ्यास राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( व्ही. गिरीराज )
प्रधान सचिव (रोहयो)

प्रत :-

मा. राज्यपाल यांचे सचिव.
मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव,

सर्व मा. मंत्री खाजगी सचिव.
सर्व मा. राज्यपाल यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव,
सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व विभागीय आयुक्त,
आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे,
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व उपनगर वगळून),
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,+
सर्व उप विभागीय अधिकारी (महसूल)
सर्व तहसिलदार (मुंबई शहर व उपनगर वगळून),
सर्व गट विकास अधिकारी (मुंबई शहर व उपनगर वगळून),
सर्व उप सचिव /अवर सचिव/कक्ष अधिकारी  रोहयो प्रभाग, नियोजन विभाग, मंत्रालय,
उप सचिव, विधानमंडळ रोहयो समिती, विधानभवन, मुंबई.
कक्ष अधिकारी, रोहयो-१ (सारसंग्रहासाठी)
निवडनस्ती - रोहयो-१.